# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## अधिवक्ता धोरण - २०२५ (Advocate Policy -२०२५)

| अ.क्र. | | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण बाबी | | |
| | अ) | सर्व न्यायालयांमधील दाव्यांसंदर्भात पात्रतेविषयक अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील | २-७ |
| | ब) | न्यायालय व इतर कामकाजाकरिता नियुक्त करावयाचे विधीज्ञ | |
| | क) | अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे | |
| | ड) | निवडीची सर्वसाधारण प्रकिया व अर्ज करण्याची पद्धत | |
| | इ) | प्राधिकरणाच्या पॅनलवरील नियुक्त विधीज्ञांकरिता असलेल्या अटी व शर्ती | |
| | ई) | प्राधिकरणाच्या पॅनलवरील नियुक्त विधीज्ञांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या | |
| २. | | नियुक्तीचा निकष | ७-८ |
| ३. | | विधीज्ञ देयकाचे (Fee) दर व त्याबाबतचे निकष:- | ८ -१३ |

अ) **<u>सर्व न्यायालयांमधील दाव्यांसंदर्भात पात्रतेविषयक अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील :-</u>**

i) अर्जदार हा भारताचा नागरिक असावा.

ii) अर्जदाराकडे मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी असावी.

iii) अर्जदाराने सनद धारण केलेली असावी. (बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा किंवा बार कॉन्सिल ऑफ इंडीया येथील नोंदणी.)

iv) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदारास किमान ५ वर्षाचा न्यायालयीन कामकाजाचा अनुभव असणे अनिवार्य असेल व अर्जदाराची वयोमर्यादा ६० वर्षापेक्षा जास्त नसावी.

v) अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

vi) प्राधिकरणाच्या विधीज्ञ पॅनलवर यापुर्वी नियुक्त असलेल्या अर्जदारास त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या प्रकरणांचे निकाल प्राधिकरणाच्या बाजूने झाल्याबाबतचे प्रमाण विचारात घेवून पुन्हा नियुक्ती बाबत विचार करण्यात येईल. याबाबतचा तपशील त्यांनी अर्जासोबत सादर करावा.

vii) जुन्या पॅनलमध्ये नियुक्त केलेल्या विधीज्ञांनी नेमणूक करावयाची असल्यास पुनश्चः अर्ज सादर करणे अनिवार्य असेल.

**अर्जदाराने विधीज्ञांचे धोरण व त्यामधील अटी व शर्ती मान्य आहेत असे समजुन अर्ज केला आहे असे मानले जाईल.**

आ) **न्यायालय व इतर कामकाजाकरिता नियुक्त करावायाचे विधीज्ञ:-**

| **अ.क्र.** | **कामकाज निहाय्य विधीज्ञ** |
|---|---|
| १. | मे. सर्वोच्च न्यायालय (Hon'ble Supreme Court) |
| २. | मे. उच्च न्यायालय (Hon'ble High Court) |
| ३. | मे जिल्हा व सत्र न्यायालय (Hon'ble District & Session Court)<br>(विविध तालुके जसे की, खेड , दौंड, बारामती, वडगाव मावळ, शिरुर, पुरंदर ईत्यादी) |
| ४. | मे. राष्ट्रीय हरित लवाद (Hon'ble Nation Green Tribunal) |
| ५. | महसूल न्यायालय (Revenue Court) |
| ६. | शिर्षक शोध अहवाल व कायदेशीर अभिप्राय (Title Search & Legal Opinion) |
| ७. | मे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) |
| ८. | तांत्रिक कायदेशीर व करार कायदा (Tehno Legal & Contract) |
| ९. | कर आकारणी कायदा (Income Tax & GST) |

क) **अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे:-**

i) उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेले वय, शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेल्या प्रमाणपत्रांच्या/ दाखल्यांच्या स्वसाक्षांकित प्रती (Self Attested Xerox Copies)अर्जासोबत स्कॅन करुन ईमेलवर सादर करावे तसेच सदरच्या स्वसाक्षांकित प्रती मुळ कागदपत्रांसह मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

ii) उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला अचूक भ्रमणध्वनी क्रमांक, WhatsApp क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावा.

iii) वयाच्या पुराव्याकरिता शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड व पॅनकार्ड .

iv) Degree Certificate, Certificate of Practice, Enrollment Certificate, Bar Membership Certificate, Experience certificate issue by Bar Association & AOR Certificate.

ड) **निवडीची सर्वसाधारण प्रकिया व अर्ज करण्याची पद्धत**

i) अर्जदाराने सदर पदाकरीता जाहिरातीच्या दिनांकापासुन ७ दिवसांच्या आत सह आयुक्त प्रशासन, पहिला मजला, विधी कक्ष प्रशासन विभाग, नविन प्रशासकीय इमारत, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी ,पुणे -४११०४४ या पत्यावर पोहचेल अशा रितीने अर्ज कार्यालयात प्रत्यक्ष हमदस्त (By Hand) दाखल करावा अथवा legaldept.pmrda@gmail.com या ई-मेल आयडीवर PDF फॉरमॅट मध्ये मुदतीत पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबतची कोणतीही तक्रार करता येणार नाही.

ii) पॅनल विधीज्ञ नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज हा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (www.pmrda.gov.in) च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असुन सदर अर्जाचा नमुना डाउनलोड करुन अर्ज परिपूर्णरित्या भरून सदर ऑनलाईन अर्ज व त्या सोबत सर्व कागदपत्रे (Self Attested) स्व सांक्षाकित ई-मेल द्वारे (legaldept.pmrda@gmail.com) पाठवावेत. अपुर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

iii) जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींचे पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रे /प्रमाणपत्रे यांची स्वसाक्षांकित प्रत जोडणेत यावी तसेच अर्जातील माहिती ही परीपूर्ण भरावी. अपूर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास अर्ज अपात्र ठरविणेत यईल.

iv) प्राप्त अर्जांची छाननी करुन मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांना अर्जात नमुद केलेल्या ई-मेल आयडीवर व दुरध्वनी किंवा WhatsApp द्वारे कळविण्यात येईल.

v) अर्जदाराची निवड ही मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीस जे अर्जदार उपस्थित राहणार नाहीत, अशा अर्जदारांचा पॅनल नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

vi) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

vii) अर्जदाराला मुलाखतीस आल्याने कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

viii) गठीत केलेल्या समिती मार्फत मुलाखतीद्वारे अर्जदारांची निवड केली जाईल.

ix) निवडीची प्रक्रीया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/तहकुब करणे/रद्द करणेचे अधिकार मा. महानगर आयुक्त ,पुमप्रविप्रा,पुणे यांचेकडे राखीव राहतील.

इ) **प्राधिकरणाच्या पॅनलवरील नियुक्त विधीज्ञांकरिता असलेल्या अटी व शर्ती –**

i) पॅनल विधीज्ञ यांनी सोपविलेल्या न्यायालयीन प्रकरणांचे संपूर्ण कामकाज पाहणे व त्याबाबतचा विस्तारित तपशिल विधी कक्षाने सादर केलेल्या नमुन्यामध्ये महिन्याअखेरीस देणे बंधनकारक राहील.

ii) सोपविलेल्या प्रकरणांमध्ये गुणवत्ता व गतिमानता ठेवणे आवश्यक राहील.

iii) प्राधिकरणाच्या हिताचे संवर्धन होईल यादृष्टीने प्रशासकीय बाबींची माहिती प्रभावीपणे तसेच शासन निर्णय, परिपत्रक, नियम पुस्तिका याचा आधार घेऊन न्यायालयात प्राधिकरणाची बाजू मांडणे अपेक्षित आहे. तसेच आवश्यकतेप्रमाणे विधी कक्षाशी समन्वय करुन आवश्यक ती न्यायालयीन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

iv) प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत /न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

v) पॅनलवरील नियुक्त विधीज्ञांना प्राधिकरणाच्या वादी/प्रतिवादी असलेल्या प्रकरणी प्राधिकरणाच्या विरोधात कोणत्याही स्वरुपाच्या दाव्यात वकीलपत्र घेता येणार नाही असे घडल्यास त्यांची विधीज्ञ पॅनलवरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

vi) पॅनलमधील नियुक्तीच्या अगोदर प्राधिकरण विरोधात कोणत्याही न्यायालयासमोर सद्यस्थितीमध्ये विधीज्ञ यांचे दावे चालू असल्यास त्यांना प्रथम असे व्यक्तीगत चालू दावे परत

करणे अनिवार्य राहील. असे न घडल्यास त्यांची विधीज्ञ पॅनलवरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

vii) त्यानंतरच प्राधिकरणाच्या स्तरावर बोलविण्यात येणाऱ्या विधीज्ञांच्या मासिक/आवश्यकतेनुसार बोलविलेल्या बैठकांना उपस्थित राहुन त्यांच्याकडे सोपविलेल्या प्रकरणांच्या सद्यस्थिती विषयी माहितीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.

viii) पॅनलवरील विधीज्ञ , त्यांच्याकडे सोपविलेल्या प्रकरणांच्या बाबतीत प्राधिकरणाची बाजू पुरेशा प्रभावाने मांडत नसल्याची बाब निर्दशनास आल्यास त्याचे सदर प्रकरणातील वकीलपत्र रद्द करण्यात येईल अथवा त्यांची पॅनलवरील नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

ix) प्राधिकरणाच्या न्यायालयीन प्रकरणांची सद्यस्थिती वेळोवेळी विभागप्रमुख व विधी कक्ष यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. मे. न्यायालयाचे डॅशबोर्डचे अवलोकन करुन प्रकरणाच्या हालचाली व सद्यस्थिती बाबत दक्ष राहणे अनिवार्य आहे.

x) **नियुक्त विधीज्ञांकडुन दावा परत घेण्याबाबतचे तसेच पॅनलमधील नियुक्ती रद्द करण्याबाबतचे अधिकार मा. महानगर आयुक्त यांचेकडे सर्वोतोपरी राहतील.**

## ई) प्राधिकरणाच्या पॅनलवरील नियुक्त विधीज्ञांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या :-

i) प्राधिकरणाच्या हिताचे संवर्धन होईल या दृष्टीने प्रशासकीय बाबींची माहिती घेवून त्यास आवश्यक तो कायद्याचा आधार देवून प्राधिकरणाची बाजू प्रभावीपणे न्यायालयात मांडणे .

ii) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी पाठपुरावा करणे,जेथे प्राधिकरण प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे कैफियत, पुराव्याचे प्रतिज्ञाप्रत्र संबधित विभागातील अधिकारी व विधी कक्षाच्या मदतीने तयार करून अंतिम करणे.

iii) प्राधिकरणाच्या हिताच्या दृष्टिने प्रकरणाबाबतची आवश्यक ती गोपनियता बाळगणे.

iv) जेथे प्राधिकरणाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे,अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयांचा अभ्यास करुन ,तद्अनुषंगाने अपिल दाखल करण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करणे.

v) मा. महानगर आयुक्त, संबधित विभागांचे विभागप्रमुख किंवा विधी कक्ष यांनी एखाद्या दाव्यासंदर्भात चर्चा करणेकामी बोलविल्यास उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

vi) पॅनलमधील विधीज्ञांकडे काम दिल्यानंतर विधीज्ञाला स्वत: हुन पॅनल सोडावयाचे असल्यास अथवा प्राधिकरणाकडुन विधीज्ञाला पॅनल मधुन काढल्यास अशा दोन्ही परिस्थतिमध्ये विधीज्ञाने प्राधिकरणाने सोपविलेले सर्व दावे तात्काळ प्राधिकरणास परत करणे अनिवार्य राहिल व तसेच हस्तातरणाची सर्व प्रक्रीय पुर्ण करणे बंधणकारक असेल. तसेच सदरील हस्तांतरीत दाव्यांमधील विधीज्ञांने केलेल्या कामकाजाची पुर्तता पाहुन देयक अदा करण्यात येईल.

vii) दावा देताना विधीज्ञांचे नैपुण्यता, वैशिष्ठ, जेष्ठता, उपलब्धता, सहकार्य, समन्वय व सोबत दावे जिंकण्याची क्षमता इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातील.

viii) प्राधिकरणाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या दाव्यांसदर्भात न्यायालयांकडुन कोणतेही निकाल (प्राधिकरणाच्या वतीने/ प्राधिकरणाच्या विरोधात) लागला असेल तर तो संबधित विभागाच्या व विधी कक्ष यांच्या तात्काळ निर्शनास आणुन देण्यात यावा. तसेच आवश्यक असल्यास वरच्या न्यायालयात अपिल दाखल करण्यासाठी योग्य ती मागणी करणे आवश्यक राहील.

ix) पॅनल मधील विधीज्ञांनी संपुर्णत: त्यांच्याकडील नियुक्ती केलेल्या दाव्यांमध्ये स्वत: दावा चालवणे बंधनकारक राहील व नियुक्त केलेल्या दावे कोणत्याही पॅनल बाह्य विधीज्ञांना हस्तांतरण करता येणार नाही.

x) पॅनल विधीज्ञांनी तयार केलेल्या सर्व दाव्यांचे कागदपत्र (Reply/Statement/Affidavit Etc.) न्यायालयामध्ये सादर करण्यापूर्वी संबधीत विभागांकडुन तपासणी करुन विभागप्रमुखांच्या संमतीने मगच सादर करण्यात यावेत. तसेच संबधित विभागांकडुन न्यायालयीन दाव्यांचे सर्व कागदपत्रे घेण्याची जबाबदारी पूर्णत: पॅनल विधीज्ञांची असेल.

xi) नियुक्त विधीज्ञांनी वकीलपत्र दाखल केल्यापासुन पुढील १५ दिवसांच्या आत न्यायालयीन प्रक्रीयेमधील Reply/Statement/Affidavit Etc. विभागास सादर करावे.

xii) आवश्यक असल्यास मराठीत / इंग्रजी मध्ये अनुवाद करावयाचे असल्यास ते विधीज्ञांनी स्वत: तयार करुन त्यानंतर अधिकाऱ्यांसमवेत अतिंम करावेत व त्याबाबतचा कोणतेही अतिरिक्त देयक अदा केले जाणार नाही.

xiii) आलेल्या अर्जांपैकी कोणताही अर्ज कारण न देता अमान्य करण्याचा अधिकार मा. महानगर आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

xiv) पॅनल वरती मुलाखतीसाठी नियुक्तीसाठी निवड झालेल्या विधीज्ञांना प्राधिकरणतर्फे त्याबाबत कळविण्यात येईल.

xv) अर्ज करताना अर्जात दिलेली माहिती खोटी निघाल्यास संबधित विधीज्ञांनी पॅनलमधुन काढुन टाकणेत येईल.

xvi) सदरचे धोरण तसेच अटी व शर्तीमध्ये पुर्णत: बदल करणे इत्यादी बाबतचे पुर्ण अधिकार मा. महानगर आयुक्त यांचेकडे राखीव असतील.

xvii) Litigation & Non Litigation या दाव्यांसाठी एकत्रित अधिवक्ता पॅनलमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे.

xviii) दाव्याचे नियुक्ती पत्र, वकीलपत्र व दाव्यासंबधित सर्व कागदपत्रे प्राधिकरण कार्यालयामध्ये येवून प्राप्त करणे अनिवार्य असेल.

xix) हस्तांतरीत दाव्यामध्ये ना –हरकत पूर्वीच्या विधीज्ञांकडुन प्राप्त करुन घेणे अनिवार्य असेल.

उपरोक्त विधीज्ञ धोरण २०२५ अन्वये नमुद केलेल्या सर्व अटी, शर्ती, कर्तव्य व जबाबदाऱ्यास अधिन राहुन सर्व विधीज्ञांना कामकाज पाहणे अनिवार्य राहील.

**२) नियुक्तीचा निकष:-**

i) अर्जदारास फौजदारी गुन्हे विषयक, सेवा विषयक, प्रशासकीय, दिवाणी व जमिन महसूल संहीता १९६६ विषयक, महसूल कायदा, पर्यावरण विषयक, Techno Commercial Agreement, कायदेशीर अभिप्राय, शिर्षक शोध अहवाल, भुसंपादन कायदा व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, राज्य मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, सहकार कायदा , RERA कायदा, वक्फ कायदा , कामगार विषयक कायदे, आयकर विषयक इ.कायद्याबाबत पुरेसे ज्ञान असावे

i) अर्जदाराचे संबधित मे. सर्वोच्च न्यायालय, मे. जिल्हा व सत्र न्यायालय/ मा.उच्च न्यायालय/ मे. राष्ट्रीय हरित लवाद, महसूल न्यायालय इत्यादी न्यायालयामधील कामकाजाचा अनुभव हा किमान ५ वर्ष असावा.

ii) अर्जदाराचे अर्ज सादर करतेवळी वयोमर्यादा ६० पेक्षा जास्त नसावी.

iii) वरील नमुद केलेल्या कायद्यामध्ये चालविलेल्या दाव्यांबाबतची माहिती खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे सादर करावी.

| **अ. क्र** | **न्यायालयाचे नाव** | **दावा प्रकार व क्रमांक** | **वादी व प्रतिवादी नाव** | **दाव्याची सद्यस्थिती /आदेश / निकालाची प्रतीसह** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**३) विधीज्ञ देयकाचे (Fee) दर व त्याबाबतचे निकष:-**

## LITIGATION

**१) मे. दिवाणी व जिल्हा न्यायालय, पुणे**

| **अ.क्र.** | **कामकाजाची बाब** | **विधीज्ञ फी शेरा (प्रती दावा रु.)** | **देयकाचे टप्पे** |
|---|---|---|---|
| | | **अ) देयक** | |
| १ | दिवाणी न्यायालय-कनिष्ठ व वरिष्ठ स्तर | २५,०००/- | i) कैफियत दाखल केल्यानंतर २५ %<br>ii) पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर २५ %<br>iii) निLकालानंतर उर्वरित ५० % |
| २ | जिल्हा न्यायालय सिव्हील अपिल-प्राधिकरणानाच्या वतीने | १५,०००/- | |
| ३ | जिल्हा न्यायालय सिव्हील अपिल-प्राधिकरणाविरुद्ध | १२,०००/- | |
| ४ | वरील फी शिवाय प्रत्येक Active Hearing साठी | लागू नाही | - |
| ५ | कोणत्याही न्यायालयात एकच गट/सर्व्हे नं. चे वेगवेगळे दावे चालू असतील तर ते एकत्रित करुन चालविण्यात येतील व पहिल्या दाव्यासाठी पुर्ण शुल्क व पुढील प्रत्येक दाव्यासाठी त्याच्या निम्मे शुल्क देण्यात येईल | नमूद केल्याप्रमाणे सदर तरतूद एकाच विषयाबाबत विविध वकीलांना विविध दावे असतील त्याला देखील लागू राहील. | कार्यवाहीनंतर अदा करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | आ) **इतर देयक** | | |
| १ | या शिवाय दाव्याच्या कामकाजासाठी वकीलांना झेरॉक्स, टंकलेखन, नोटरी इत्यादी कामासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च दिला जाईल | ५,०००/- चे मर्यादेत पूर्ण दाव्यासाठी | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| २ | कॅव्हेट तयार करणे व दाखल करणे मे. जिल्हा सत्र न्यायालय व इतर | २,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |

**टिप:**

पुणे शहरात कार्यक्षेत्रात लागू असलेले महसुल, जिल्हा ग्राहक मंच व राज्य ग्राहक मंच, RERA पुणे, आयकर पुणे, कामगार आयुक्त पुणे व धर्मादाय आयुक्त पुणे उपरोक्त प्रमाणे देयक लागू राहील.

## २) मे. उच्च न्यायालय

| अ.क्र. | कामकाजाची बाब | विधीज्ञ फी शेरा (प्रती दावा रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| | अ) **देयक** | | |
| १ | मे. उच्च न्यायालय प्राधिकरणाने रिट पिटीशन, जनहित याचिका व रिव्ह्यु याचिका दाखल केल्यास | ५०,०००/- | iv) कैफियत दाखल केल्यानंतर २५ %<br>v) पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर २५ %<br>निकालानंतर उर्वरित ५० % |
| २ | मे. उच्च न्यायालय प्राधिकरणाविरुद्ध रिट पिटीशन, जनहित याचिका व रिव्ह्यु याचिका दाखल केल्यास | ३५,०००/- | |
| ३ | मे. उच्च न्यायालयात प्राधिकरणाचे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केल्यास | २५,०००/- | |
| ४ | मे. उच्च न्यायालयात प्राधिकरणाविरुद्ध सिव्हील ॲप्लीकेशन असल्यास | १५,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | आ) इतर देयक | | |
| १. | मे. उच्च न्यायालयमध्ये या शिवाय दाव्याच्या कामकाजासाठी वकीलांना झेरॉक्स व टंकलेखन कामासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च दिला जाईल | ५,०००/- चे मर्यादेत पूर्ण दाव्यासाठी | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| २. | कॅव्हेट तयार करणे व दाखल करणे मे. उच्च न्यायालय | ३,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |

**टिप:**

मुंबई शहरात स्थित असलेल्या सर्व Appelate Authorities मध्ये चालवल्या जाणाऱ्या सर्व दावा याचिकांकरिता उपरोक्त प्रमाणे देयक लागू राहील.

## ३) मे. राष्ट्रीय हरित लवाद

| अ.क्र. | कामकाजाची बाब | विधीज्ञ फी शेरा (प्रती दावा रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. राष्ट्रीय हरित लवाद- पूर्ण दाव्यासाठी | ३५,०००/- | vi) कैफियत दाखल केल्यानंतर २५ % <br> vii) पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर २५ % <br> i) निकालानंतर उर्वरित ५० % |
| २ | मे. राष्ट्रीय हरित लवाद- दिल्ली प्रवास खर्च | 3 AC Ticket & Stay of Rs. 5,000/- per day to a maximum of 2 days upon submit actual bills | कार्यवाहीनंतर अदा करणे |

## ४) मे. सर्वोच्च न्यायालय

| अ.क्र. | कामकाजाची बाब | विधीज्ञ फी शेरा (प्रती दावा रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. सर्वोच्च न्यायालय/ मे. उच्च न्यायालय- Advocate on Record / Senior | मा. महानगर आयुक्त /मा. अतिरिक्त महानगर | कार्यवाहीनंतर अदा करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | Counsel यांनी सादर केलेल्या देयकाप्रमाणे व मा. महानगर आयुक्त /मा. अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी मान्य केल्याप्रमाणे | आयुक्त यांनी मान्य केल्याप्रमाणे | |
| २ | कॅव्हेट तयार करणे व दाखल करणे मे. सर्वोच्च न्यायालय | ५,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |

## NON- LITIGATION देयक

| अ.क्र. | कामकाजाची बाब | विधीज्ञ फी शेरा | शेरा |
|---|---|---|---|
| १ | कायदेशीर अभिप्राय (लिगल ओपिनियन) | ५,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| २ | शिर्षक शोध (टायटल सर्च)<br>➢ एकुण पाच गटापर्यंत<br>➢ पुढील प्रत्येक एका गटाकरीता<br><br>(सदरील टायटल सर्च च्या कामकाजासाठी लागणारे कागदपत्रे व दस्तऐवज ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने आवश्यकतेनूसार काढुन घ्यावेत व त्यासाठी लागणारा खर्च दिला जाईल.)<br><br>टिप: सदर खर्च हा कार्यालयीन At Actual असणे बंधनकारक असेल तसेच सदर खर्च करण्यापूर्वी संबधित विभागाची लेखी परवानगी घेणे आवश्यक असेल. | <br>१०,०००/-<br>३,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| ३ | टेक्नो कमर्शियल ओपिनियन/ लेटर ड्राफ्टींग (रिप्लाय टु लेटर)<br>➢ ड्राफ्ट तयार करणे व अंतिम मसुदा तयार करणे<br>➢ रिव्ह्यु करुन अंतिम मसुदा तयार करणे | <br>१५,०००/-<br>१२,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | रिव्ह्यु ऑफ एम ओ यु/ ॲग्रीमेंट अंतिम मुसदा (Final Draft)<br>➢ ड्राफ्ट तयार करणे व अंतिम मसुदा तयार करणे<br>➢ रिव्ह्यु करुन अंतिम मसुदा तयार करणे | <br><br>१५,०००/-<br>१२,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| ५ | लिगल नोटीस<br>➢ ड्राफ्ट तयार करणे<br>➢ उत्तर (नोटीस रिप्लाय) | <br>५,०००/-<br>३,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| ६ | निविदा : रिव्ह्यु<br>➢ ५० लाखापर्यंत<br>➢ ५० लाख ते ५ कोटी पर्यंत<br>➢ ५ कोटी पूढील | <br>३,०००/-<br>५,०००/-<br>७,०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |

**वरील फी चे अनुषंगाने इतर अनुशंगीक बाबी खालीलप्रमाणे राहतील.**

ii) पॅनल विधीज्ञांना वरीलप्रमाणे प्रत्येक दाव्यासाठी/ केससाठी ठोक मानधन राहील. प्रत्येक तारखेला स्वतंत्र खर्च देय राहणार नाही.

iii) नियुक्त विधीज्ञांचे देयक पुमप्रविप्रा,पुणे यांनी ठरविलेल्या अधिवक्ता धोरणा प्रमाणे ग्राह्य धरण्यात येईल.

iv) उपरोक्त नमुद अनुज्ञेय खर्चामध्ये न्यायालयात सादर करावयाचे लेखी म्हणणे,जादा म्हणणे दावा दुरुस्ती व विधीज्ञांनी कोर्टात सादर करावायाचे अर्जाचे टायपींग, निकालाची प्रत मागवुन घेणे व इतर खर्चांचा समावेश आहे. प्राधिकरणाच्या वतीने रिट याचिका , दावा किंवा अपील दाखल करताना विहीत कोर्ट फी भरावी लागत असल्यास ती अतिरिक्त देय राहील.

v) प्राधिकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व संवेदनशील दाव्यांमध्ये तसेच वर नमुद देयकामध्ये प्रकरण परत्वे वाढ करणेचे अधिकार मा महानगर आयुक्त यांना राहतील.

vi) पॅनलमध्ये विशिष्ट विधीज्ञ अथवा पॅनल बाह्य विधीज्ञांची नियुक्ती करण्याचा व त्यांचे देयक ठरविण्याचे अधिकार मा. महानगर आयुक्त यांना राहतील.

vii) नविन पॅनल चा कालावधी एकुण ३ वर्षांपर्यंत असेल. तथापि,सदरील काळ हा हक्क म्हणुन न मानता तो एकुण वाढीव काळ पुर्णत: संबधित वकीलांच्या सकारात्मक कामगिरी ,सहकार्य इत्यादी गुणवत्तेवर अवलंबुन असेल व त्याचा पुर्णत: अधिकार पुमप्रविप्रा,पुणे चा असेल.

viii) Senior Counsel यांचे नेमणूक व मेहनतनामा ठरविण्याचे अधिकार हे मा. महानगर आयुक्त ,पुमप्रविप्रा,पुणे व अतिरिक्त महानगर आयुक्त यांना राहतील.

ix) कामाचे वाटप सर्व पॅनल विधीज्ञांचे त्यांचे कामकाजाचे विभागणी प्रमाणे व त्यांचे कौशल्य ,कौशल्य क्षेत्र ,अनुभवामध्ये वरिष्ठता ,उपलब्धता,पुमप्रविप्रा सोबत समन्वय, दावा जिंकण्याची क्षमता इत्यादीवर अवलंबून राहील. पॅनलमधील विधीज्ञांशी कोणत्या विषयाशी निगडीत किंवा किती प्रकरणे सोपवावीत याचा सर्वस्वी निर्णय विधी कक्षाकडुन घेण्यात येईल.

x) नियुक्त विधीज्ञांना नियुक्त कालावधीच्या आधी जर न्यायालयातील सोपवलेले काम माघारी द्यावयाचे असल्यास त्यांनी आगावू सुचना (१ महीना) देणे व त्यांच्याकडील सर्व कागदपत्रे पुढील विधीज्ञ नेमणेकरिता ना-हरकत (NOC) सहीत आगावू सुचनेसोबत जमा करणे व आवश्यकत्येप्रमाणे Briefing करणे बंधनकारक राहील. सदरील आगावू सुचनेसोबत वकीलांनी त्यांच्याकडे सोपविलेल्या दाव्यांची ना हरकत प्रमाणपत्र व पुढील तक्त्यामध्ये माहिती भरुन द्यावी.

| **अ. क्र** | **न्यायालयाचे नाव** | **दावा प्रकार व क्रमांक** | **वादी व प्रतिवादी नाव** | **दाव्याचा स्टेटस / निकाल** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

xi) नियुक्त विधीज्ञांचे कामकाज समाधानकारक नसल्यास त्यांची सेवा मुदत पूर्व संपुष्टात आणण्यात येईल असे झालेस सदर विधीज्ञांना पुन: नियुक्तीची मुभा राहणार नाही.

तरी अधिवक्ता धोरण -२०२५ मध्ये बदल, नविन नियम, अटि व शर्ती इत्यादी बाब लागु व सुधारणा करण्याचे सर्व अधिकार मा. महानगर आयुक्त यांना राहतील.

डॉ.योगेश म्हसे (भा.प्र.से.)
**महानगर आयुक्त**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे**